# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १) गुन्ह्यांना पायबंद | : | १ ते १२ |
| २) कारवाई | : | १३ ते ३० |
| ३) लोकाभिमुख उपक्रम | : | ३१ ते ४६ |
| ४) पोलिसांमधील माणूस | : | ४७ ते ५२ |
| ५) समुपदेशन व सामाजिक बांधीलकी | : | ५३ ते ६० |
| ६) वाहतुक सुलभता | : | ६१ ते ७२ |
| ७) उत्कृष्ट कार्य | : | ७३ ते ८० |
| ८) उत्कृष्ट तपास | : | ८१ ते १०६ |

# गाडी विक्रीच्या बहाण्याने फसवणूक करणाऱ्या मायलेकाला अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** नामांकित फायनान्स कंपनीच्या नावाचा वापर करुन गाडी विक्री करण्याच्या बहाण्याने नागरिकास तीन लाखांची फसवणूक करणाऱ्या मायलेकास स्वारगेट पोलिसांनी अटक केली आहे.

प्रफुल्ल प्रभाकर उबाळे (वय २७) आणि कमल प्रभाकर उबाळे (वय ५०, दोघे रा. काळे कॉलनी, ससाणेनगर) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. त्यांचा एक साथीदार रोहन ऊर्फ असिफ सय्यद हा फरार आहे.

याप्रकरणी कृष्णकुमार मेहता (वय २५, रा. वानवडी) यांनी फिर्याद दिली आहे.

याबाबत पोलिसांनी सांगितले की, मेहता यांना एक चारचाकी गाडी खरेदी करायची होती. त्यामुळे त्यांनी परिचयातील रोहन ऊर्फ आसिफ सय्यद याला सांगितले. सय्यद याने त्याची एका नामांकित फायनान्समध्ये ओळख असल्याचे सांगून उबाळे माय लेकासोबत परिचय करुन दिला. यानंतर या दोघांनी मेहता यांना फायनान्स कंपनीच्या गोडाऊनला बोलावून गाडी दाखवली. व्यवहार ठरल्यानंतर आरोपींनी सांगितल्याप्रमाणे मेहता यांनी त्यांनी दिलेल्या बँक खात्यावर २ लाख ९८ हजार भरले. मात्र ठरल्याप्रमाणे त्यांना कोणतीही चारचाकी गाडी मिळाली नाही. यानंतर त्यांनी आरोपींकडे चौकशी केली तेव्हा त्यांनी गाडी किंवा पैसे मागितले तर पोलिसात तक्रार देण्याची धमकी दिली. मेहता यांनी आरोपींच्या बाबतीत फायनान्स कंपनीकडे चौकशी केली तेव्हा अशी कोणतीच माणसे या ठिकाणी कामाला नसल्याचे समजले. दाखल गुन्ह्याच्या अनुषंगाने तपास करत असताना पोलिसांनी आरोपींना अटक केली. ही कामगिरी वरिष्ठ निरीक्षक ब्रम्हानंद नाईकवडी, महिला पोलीस उपनिरीक्षक एम. जी. त्र्यंबके यांच्या पथकाने केली.



नामांकित फायनान्स कंपनीच्या नावाचा वापर करुन गाडी विक्री करण्याच्या बहाण्याने नागरिकांची फसवणूक करणाऱ्यास स्वारगेट पोलिसांनी अटक केली.

- या तिघांनी आतापर्यंत अनेकांना फायनान्स कंपनीत असल्याची बतावणी करत गाडी विक्री करण्याच्या बहाण्याने गंडा घातला आहे. याबाबत आतापर्यंत ५ जणांनी स्वारगेट पोलीस ठाण्यात तक्रार अर्ज दिले आहेत.
- त्यामुळे फसवणूक झालेल्यांची संख्या मोठी असण्याची शक्यता असल्यामुळे कोणाची फसवणूक झाली असल्यास त्यांनी स्वारगेट पोलिसांशी संपर्क करावा, असे आवाहन वरिष्ठ पोलीस निरीक्षक नाईकवडी यांनी केले आहे.

पुढारी – दि. २५ फेब्रुवारी, २०२०

# दहशत पसरविणारा सराईत एक वर्षासाठी स्थानबद्ध

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

चतुःश्रृंगी पोलिस ठाण्याच्या परिसरात वारंवार दहशत माजविणाऱ्या सराईत गुंडाला पुणे पोलिस आयुक्त डॉ. के. व्यंकटेशम यांनी एक वर्षासाठी स्थानबध्द करण्याचे आदेश दिले आहेत.

नागेश उर्फ तम्मा दुर्गप्पा कुसाळकर (२९, हेल्थ क्लब, नीलेगर मठाजवळ, वडारवाडी) असे एमपीडीए अंतर्गत स्थानबध्दतेची कारवाई करण्यात आलेल्याचे नाव आहे. कुसाळकर याने साथीदारांसह चतुःश्रृंगी आणि डेक्कन पोलिस ठाण्याच्या हद्दीत कोयता, लोखंडी बार, लाकडी काठ्या यांसारखी हत्यारे बाळगून परिसरात हाणामारी, दंगा, खुनाचा प्रयत्न यासारखे गंभीर गुन्हे केले आहेत. त्याची ही दहशत २०१० पासून सुरू आहे. त्याच्यावर पाच गुन्हे दाखल आहेत. वेळोवेळी प्रतिबंधात्मक कारवाई करूनही त्याच्यात कोणतीही सुधारणा होत नव्हती.

तसेच त्याच्या गुन्हेगारी कृत्यामुळे परिसरातील सार्वजनिक सुव्यवस्थेला बाधा निर्माण होत होती. तसेच त्याच्या जीवाला व मालमत्तेला धोका पोहचविणाऱ्या कृत्यामुळे कोणीही त्याच्याविरूध्द तक्रार करण्यासाठी धजावत नव्हता. त्यामुळे पोलिस निरिक्षक अनिल शेवाळे यांनी एमपीडीएचा प्रस्ताव तयार करून तो पोलिस आयुक्तांकडे सादर केला. त्यानुसार त्याच्यावर एक वर्षासाठी स्थानबध्दतेची कारवाई करण्यात आली. पोलिस आयुक्त के. व्यंकटेशम यांनी दहशत निर्माण करणाऱ्या अट्टल गुन्हेगारांवर कडक प्रतिबंधात्मक कारवाई करण्याचे धोरण अवलंबिले.

लोकमत – दि. ७ फेब्रुवारी, २०२०

# मसाजच्या नावाखाली वेश्याव्यवसायाचा पर्दाफाश

## ६९ वर्षांच्या मॅनेजरला अटक

**पुणे :** मसाज पार्लरच्या नावाखाली वेश्याव्यवसाय करणाऱ्या यंग स्पा सेंटरवर कोंढवा पोलिसांनी छापा टाकून ५ तरुणीची सुटका केली. या स्पाच्या ६९ वर्षांच्या मॅनेजरला पोलिसांनी अटक केली आहे.

नवीन चुनीलाल शहा (वय ६९, रा. राहेजा वुडस सोसायटी, कल्याणीनगर) असे त्याचे नाव आहे. हा यंग स्पा सेंटर याचा मुलगा अंकित नवीन शहा (रा. कल्याणीनगर) याच्या मालकीचा असून पोलीस त्याचा शोध घेत आहेत. याप्रकरणी पोलीस नाईक सुशील धिवार यांनी कोंढवा पोलिसांकडे फिर्याद दिली आहे. कोंढवा पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक विनायक गायकवाड यांना कोंढव्यातील एनआयबीएम रोडवरील यंग स्पा सेंटर येथे मसाज पार्लरच्या नावाखाली वेश्या व्यवसाय सुरु असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी बनावट ग्राहक तयार करुन त्याला बुधवारी सायंकाळी आठ वाजता यंग स्पा सेंटर येथे पाठविले. मॅनेजर नवीन शहा याने पैसे स्वीकारुन ग्राहकाला एका खोलीत पाठविल्यानंतर त्याने मिस कॉल दिला. त्यानंतर पोलिसांनी स्पावर छापा घातला. तेथे पाच तरुणी होत्या. नवीन शहा व त्याचा मुलगा अंकीत शहा यांनी या पैशाचे आमिष दाखवून आपल्याला वेश्या व्यवसाय करण्यास प्रवृत्त केल्याचे या तरुणींनी सांगितले. पोलिसांनी नवीन शहा याला अटक केली आहे. कल्याणीनगर सारख्या पॉश परिसरात राहून पिता-पुत्र स्पाच्या नावाखाली वेश्या व्यवसाय करीत होते.

प्रभात – दि. ८ फेब्रुवारी, २०२०

# सराईत गुन्हेगारांची गुन्हे शाखेकडून झाडाझडती

**पुणे, दि. ७** - किरकोळ वाद, वर्चस्वाचा वाद तसेच जुन्या वादातून सर्वसामान्यांच्या वाहनांची तोडफोड करणाऱ्या गुंडांना जरब बसविण्यासाठी आता पोलिसांनी विशेष मोहीम हाती घेतली आहे. वाहनांची तोडफोड करून दहशत निर्माण केल्याप्रकरणी ज्यांच्यावर यापूर्वी गुन्हे दाखल करण्यात आले आहे. अशा सराईतांची गुन्हे शाखेने झाडाझडती घेण्यास सुरुवात केली आहे.

सहकारनगर भागातील तळजाई वसाहतीत रविवारी मध्यरात्री गुंडांनी वाहनांची तोडफोड केल्याची घटना घडली होती. त्याचदिवशी वारजे भागातही सहा दुचाकींची तोडफोड केली. तोडफोड करणाऱ्या गुंडप्रवृत्तीच्या सराईतांवर जरब बसविण्यासाठी गुन्हे शाखेच्या युनिट तीनकडून कोथरूड, अलंकार, सिंहगड रस्ता, दत्तवाडी, वारजे, उत्तमनगर भागांतील तोडफोडीचे गुन्हे दाखल असणाऱ्या ४१ जणांची झाडाझडती घेतली. तोडफोडीचे



गुन्हे दाखल असणाऱ्या सराईतांची चौकशी करण्यात आली, अशी माहिती गुन्हे शाखेच्या युनिट तीनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र मोकाशी यांनी दिली.

पोलिसांनी विशेष मोहीम राबवून सराईतांची चौकशी केली तसेच त्यांना समज दिली. तोडफोडीच्या घटना रोखण्यासाठी पोलिसांनी मोहीम राबविली, असे त्यांनी नमूद केले.

# गांजा विकणाऱ्यास कोठडी

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : गांजा विक्रीप्रकरणात जामीन मिळालेल्या दोन सहकाऱ्यांच्या मदतीने गांजा विक्रीच्या प्रयत्नातील एका सराइतास येरवडा पोलिसांनी अटक केली. शफी बशीर खान (वय ३४, रा. सिद्धार्थनगर गावठाण, येरवडा) असे त्याचे नाव आहे. तर, सध्या जामिनावर असलेले सुंदर जयराम मित्रोळ, शिवाजी उत्तम कुसाळे (दोघेही रा. येरवडा) हे फरार असून, त्यांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. याप्रकरणी सहायक पोलीस उपनिरीक्षक दिलीप जोशी यांनी येरवडा पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

हा प्रकार ३१ जानेवारी रोजी दुपारी साडेतीनच्या सुमारास उघडकीस आला. येरवडा येथील पर्णकुटी चौकाजवळील सार्वजनिक रस्त्यावर फिरत असताना संशय आल्याने त्याला ताब्यात घेत त्याची झडती घेण्यात आली.

यावेळी त्याच्याकडे २२ हजार रुपये किमतीचा १०० ग्रॅम गांजा आढळून आला. त्याच्याकडे हा गांजा त्याच्या दोन साथीदारांनी विकण्यासाठी दिला असल्याचे सांगितले.

पुढारी – दि. २१ फेब्रुवारी, २०२०

# फसवणूक करणाऱ्या व्यवस्थापकाला कारावास

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

शहरातील बँक ऑफ महाराष्ट्रच्या विविध शाखेतील अधिकाऱ्यांच्या पासवर्डचा वापर करुन बँकेची तब्बल अडीच कोटी रुपयांची फसवणूक करणाऱ्या व्यवस्थापकाला सीबीआयचे विशेष न्यायाधीश प्रल्हाद भगुरे यांनी दहा वर्षांची शिक्षा सुनावली. शालिवाहन मुकुंद सोलेगावकर असे शिक्षा झालेल्याचे नाव आहे. याखेरीज त्याच्याकडून २४ लाख रुपयांची रक्कम दंडापोटी वसूल केली जाणार आहे. तसेच राकेश जाधव या खासगी व्यक्तीस ३ वर्ष तुरुंगवास व १० हजार रुपयांचा दंड अशी शिक्षा ठोठावण्यात आली आहे. याप्रकरणी बँकेच्या अधिकाऱ्याने फिर्याद दिली होती.

ही घटना मे २०१८ च्या दरम्यान घडली. २८ जून २०१८ रोजी सीबीआयकडे हा गुन्हयाचा तपास सोपविण्यात आला. सीबीआयने तपास



सुरु केल्यानंतर त्यांना सोलेगावकर यांनी जाधव याच्या मदतीने बँक ऑफ महाराष्ट्रच्या वेगवेगळ्या ५ शाखांमध्ये फसवणुकीचा कट रचल्याचे समोर आले. यातून दोन्ही आरोपींनी बँकेच्या निधीतून अंदाजे एकूण २ कोटी ५६ लाख १५ हजार ९९८ रुपयांची फसवणूक केल्याचे तपासात उघड झाले आहे. सोलेगावकर याने पदाचा गैरवापर करुन शाखेतील अधिकाऱ्यांचा पासवर्ड वापरुन फसवणूक केली. सोलेगावकर यांनी बँकेच्या वेगवेगळ्या पदांवर काम केले. ते काम करताना त्यांनी राकेशच्या नावाने उघडण्यात आलेल्या बचत खात्यामध्ये रक्कम हस्तांतरित केली होती.

लोकमत – दि. १८ फेब्रुवारी, २०२०

# कोंढव्यातील ला बेला स्पावर छापा

**पुणे :** मसाज सेंटरच्या नावाखाली वेश्या व्यवसाय चालविणाऱ्या कोंढव्यातील ला बेला स्पावर कोंढवा पोलिसांनी छापा घालून ७ महिलांची सुटका केली. याप्रकरणी स्पाल मालकाला अटक केली असून फ्लॅट मालकीणसह दोघा महिलांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. स्वरुप रवी सबळ (वय २८, रा. कोणार्क युरेखा सोसायटी, वडगाव शेरी) असे या स्पा मालकाचे नाव आहे.

याबाबत पोलिसांनी सांगितले की, कोंढवा पोलिसांच्या तपास पथकातील पोलीस नाईक सुशिल धिवार यांना एनआयबीएम रोडवरील सनश्री वुडस कॉम्प्लेक्स येथील फ्लॅटमध्ये स्पा सेंटरच्या नावाखाली मुलींना ठेवून वेश्या व्यवसाय केला जात असल्याची माहिती मिळाली. या माहितीनुसार पोलिसांनी रविवारी सायंकाळी एक बनावट ग्राहक या ठिकाणी पाठविला. वेश्या व्यवसायासाठी पैसे घेतल्यानंतर घेतल्यानंतर त्याने सांकेतिक भाषेत पोलिसांना एसएमएस केला.

**पुढारी** – दि. १४ फेब्रुवारी, २०२०

# पीएमपीएल चालकाला मारहाण करणारा अटकेत

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

शासकीय कर्तव्यावर असलेल्या पीएमपीएल बस चालकाला बांबूने मारहाण करणाऱ्या एकाला भारती विद्यापीठ पोलिसांनी अटक केली. गणेश वनराज बिऱ्हामणे (३०, दुगड चाळ, शिवनेरीनगर, आंबेगाव खुर्द) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. त्याच्या दोन साथीदारांवरही गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत शंकर कोंढाळकर (३०, रा. कात्रज) यांनी फिर्याद दिली आहे. हा प्रकार बुधवारी दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास कात्रज बायपास महामार्गाकडी उजवीकडे असणाऱ्या वळणावर दत्तनगर चौक आंबेगाव येथे घडला.

फिर्यादी हे पीएमपीएल चालक असून ते बस घेऊन कात्रज बायपास महामार्गाने उजवीकडे वळण घेवून दत्तनगर सर्व्हिसरोडने जात असताना गणेश बिऱ्हामणे याने त्याची दुचाकी बस समोर घेवून आला. त्यावेळी, तू मध्ये का आला, अशी विचारणा फिर्यादी यांनी केल्यानंतर गणेशने त्यांना शिवीगाळ केली. तसेच गाडी आडवी लावून बसमध्ये तो आणि त्याचे साथीदर कोंढाळकर यांना बांबूने मारहाण करून सरकारी कामात अडथळा आणला.

**प्रभात** – दि. १८ फेब्रुवारी, २०२०

# पीएमपी बसमध्ये चोरी करणारा जेरबंद

**पुणे, दि. १७** - पीएमपीएमएल बसमध्ये गर्दीचा फायदा घेऊन तरुणाची ४४ हजारांची सोन्याची चेन हिसकाविणाऱ्या चोरट्यास विमानतळ पोलिसांनी जेरबंद केले. त्याचे तीन साथीदार फरार झाले. ही घटना दोन दिवसांपूर्वी सायंकाळी पाच वाजण्याच्या सुमारास टाटा गार्डन ते खराडी बायपास प्रवासात घडली.

विनोद शिवलाल पवार (४४, रा. मुंढवा) असे जेरबंद केलेल्याचे नाव आहे. याप्रकरणी प्रजोत चौसाळकर (३२, रा. कुर्ला, मुंबई) यांनी विमानतळ पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. प्रजोत मुळचे मुंबईतील कुर्ला परिसरातील रहिवासी असून कामानिमित्त ते पत्नीसह खराडीत आले होते. याप्रकरणी सहायक पोलीस निरीक्षक आर. ए. पाटील अधिक तपास करीत आहेत.

**पुढारी** – दि. २८ फेब्रुवारी, २०२०

# घरगुती गॅस 'ब्लॅक'ने विक्री करणारा अटकेत

- हडपसर पोलिसांची कारवाई
- ७६ हजारांचा मुद्देमाल पोलिसांकडून जप्त

**पुणे : पुढारी वृत्तसेवा**

व्यावसायिक व घरगुती गॅस सिलेंडरमधून काढून तो अवैध पद्धतीने छोट्या टाक्यात भरून त्याची काळ्या बाजारात विक्री केल्याप्रकरणी हडपसर पोलिसांनी प्रदीप गुंडु धुमाळे (वय ३२, रा. कुमार सोसायटी, फुरसुंगी) याला अटक केली आहे. यावेळी आरोपीकडून ७६ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. त्याच्याविरुद्ध जीवनावश्यक वस्तू अधिनियमाद्वारे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी पोलिस हवालदार एस.के.जोशी यांनी फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सोमवारी रात्री साडेदहा वाजण्याच्या सुमारास फुरसुंगी येथील देशमुख मळा येथील नवीन कॅनॉलजवळ रात्री साडेदहा वाजण्याच्या सुमारास एकजण हा व्यावसायिक व घरगुती कारणांसाठी वापरला जाणारा एचपी कंपनीच्या गॅस सिलेंडरमधील गॅस अवैधरित्या काढून तो छोट्या टाक्यांमध्ये भरत असल्याची खबर पोलिसांना मिळाली. त्यानुसार, पोलिसांनी घटनास्थळी छापा घातला. पोलिसांना तेथे एचपी कंपनीचे १९ किलो वजनाच्या २६ मोकळ्या टाक्या, चार किलोच्या २६ मोकळ्या टाक्या, रिलॅक्स कंपनीचे १५ किलो वजनाच्या नऊ मोकळ्या टाक्या, एक फिलर व एक इलेक्ट्रॉनिक वजनकाटा असा ७६ हजार रुपये किंमतीचा मुद्देमाल पोलिसांनी जप्त केला.

धुमाळे हा अवैधरीत्या गॅस सिलेंडरमधून काढून तो अन्य गॅस कंपनीला विकत असल्याचे निदर्शनास आल्यानंतर पोलिसांनी त्यास अटक केली. पुढील तपास हडपसर पोलिस करत आहेत.

**Pune Mirror** - 20 February, 2020

# Four arrested for duping jobseekers

## Accused issued fake offer letters

On Tuesday, Samarth police arrested four men for allegedly conning jobseekers on the pretext of providing them employment in MNCs in the IT sector.

Police had earlier received a complaint from 24-year-old Prajakta Gosawai against Unique Idea Biz Info Private Limited, a consultancy firm in Somwar Peth, accusing its owner of cheating people in the name of providing them placement in city's top MNCs. During probe, cops learnt that the owner had duped several unemployed youths by issuing fake offer letters and taking hefty sums as commissions. Hamesh Rathod, Pravin Jadhav, Sachin Neve and Sunil Pawar have been arrested and relevant records were seized, officials said.

Sub-inspector Jeeven Mohite from Samarath police station told *Mirror*, "A case has been filed under section 420 (cheating) of the Indian Penal Code and sections 66C and D (impersonation and identity theft) of the IT Act against the accused."

"In July 2019, the accused assured me a job and took Rs 82,500 towards registration fee and other charges in installments. However, I realised that I was cheated when the men started avoiding my calls and the firm I was supposed to join denied having sent me any offer letter," Gosawai said.

**— PMB**

**लोकमत** – दि. ९ फेब्रुवारी, २०२०

# येरवड्यात स्पा सेंटरवर कारवाई; दोघांना अटक

लोकमत न्यूज नेटवर्क

विमाननगर : येरवडा पोलिसांच्या महिला तपास पथकाने येरवडा परिसरात शनिवारी एका स्पा सेंटरवर कारवाई करीत दोघांना अटक केली आहे. तसेच, ईशान्येकडील दोन पीडित युवतींची सुटका करण्यात आली. पोलिसांनी पिटा कायद्यानुसार गुन्हा दाखल केला आहे. स्पा सेंटरमध्ये अनधिकृत वेश्याव्यवसाय केला जात होता.

पोलीस नाईक किशोर सांगळे यांना गोपनीय बातमीदारांकडून सृष्टी सेंटर रामवाडी येथील दुसऱ्या मजल्यावर स्टार स्पा सेंटर येथे अनधिकृत वेश्याव्यवसाय सुरु असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार महिला पोलीस उपनिरीक्षक शुभांगी मगदूम व तपास पथकातील महिला पोलीस कर्मचारी यांनी छापा टाकला.

याठिकाणी दोन ईशान्येकडील पीडित युवतींकडून स्पा पार्लरच्या नावाखाली अनधिकृत वेश्याव्यवसाय केला जात असल्याचे समोर आले. पोलिसांनी स्टीफन जेवियर जोसेफ (वय ३८, रा. वडगाव शेरी) व अरी वेल गोन भास्करण (वय २४, रा. वडगावशेरी) यांना अटक केली आहे.

पोलीस उपायुक्त सुहास बावचे, सहायक आयुक्त रामचंद्र देसाई, वरिष्ठ पोलीस निरीक्षक युनूस शेख यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक बलभीम ननावरे, उपनिरीक्षक शुभांगी मगदूम व तपास पथकातील महिला कर्मचारी यांनी ही कारवाई केली.

**पुढारी** – दि. २४ फेब्रुवारी, २०२०

# सलूनचालकाला हप्ता मागणारा अटकेत

## अल्पवयीन साथीदारही ताब्यात

**पुणे : प्रतिनिधी**

सलूनचालकाने प्रतिमहा पाच हजारांचा हप्ता न दिल्याच्या कारणावरून त्याच्या दुकानाची काच फोडणाऱ्या एकाला हडपसर पोलिसांनी अटक केली. त्याच्यासह त्याच्या अल्पवयीन साथीदारालाही पोलिसांनी ताब्यात घेतले.

मुस्तकीम ऊर्फ मुस्ताक (१८, रा. बी.जी एस पार्कजवळ, महादेवनगर, मांजरी) असे अटक करण्यात आलेल्याचे नाव आहे. याबाबत ३५ वर्षीय व्यक्तीने हडपसर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. हा प्रकार शुक्रवारी रात्री आठ वाजण्याच्या सुमारास महादेवनगर येथील चौरंग अंगणमधील शॉप क्रमांक १३ मध्ये घडला. घटनेच्या दिवशी शेख आणि त्याचे साथीदार फिर्यादींच्या दुकानावर गेले. त्यांनी फिर्यादींना ५ हजारांच्या खंडणीची मागणी केली.

परंतु, ती देण्यास नकार दिल्यानंतर सर्वांनी त्यांच्या दुकानाच्या काचा फोडून फिर्यादीला व त्यांच्या भावांना हाताने व लाथाबुक्क्यांनी मारहाण करून जिवे मारण्याची धमकी दिली. त्यांच्या भीतीने शेजारील दुकानदारांनी त्यांची दुकाने बंद केली. त्यांनी हातात कोयते घेऊन परिसरात दहशत माजविण्याचा प्रयत्न केल्याबाबत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्ह्याचा तपास सहायक पोलिस निरीक्षक खोपडे करत आहेत.

**लोकमत** – दि. १२ फेब्रुवारी, २०२०

# जिवे मारण्याची धमकी देऊन खंडणी मागणाऱ्या तिघांना अटक

पुणे : रस्त्याच्या दुरुस्तीचे काम सुरु असताना २ लाख रुपयांची खंडणी मागून जिवे मारण्याची धमकी देणाऱ्या तिघांना येरवडा पोलिसांनी अटक केली आहे. सागर आदिनाथ हनुमंते, आदिनाथ राजेंद्र हनुमंते (वय २१) आणि वृषभ बाबा पिसे (वय २१, सर्व रा. आर के चौक, येरवडा) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत.

याप्रकरणी उत्तम राजेंद्र वडवराव (वय ३४, रा. सेवक चौक, येरवडा) यांनी फिर्याद दिली. वडवराव यांनी महापालिकेचे ऑनलाईन निविदा भरुन रस्तादुरुस्तीचे काम करत होते. या वेळी तिघांनी काम करायचे असेल तर आम्हाला दोन लाख रुपयांची खंडणी द्यावी लागेल, अशी मागणी केली. पैसे दिले नाही तर जिवे मारण्याची धमकी दिली. वडवराव यांच्या फिर्यादीनुसार पोलिसांनी तिघांना अटक करुन न्यायालयात हजर केले. न्यायालयाने अधिक तपासासाठी त्यांना १३ फेब्रुवारीपर्यंत पोलीस कोठडीत ठेवण्याचा आदेश दिला आहे.

**महाराष्ट्र टाइम्स** – दि. १२ फेब्रुवारी, २०२०

# मांडुळाची तस्करी करणाऱ्यास अटक

मटा प्रतिनिधी,पुणे

गणेश पेठेत मांडुळाची तस्करी करण्यासाठी आलेल्या एका व्यक्तीला फरासखाना पोलिसांनी अटक केली आहे. त्याच्याकडून तीन लाख रुपये किमतीचे अडीच किलो वजनाचे मांडूळ जप्त करण्यात आले आहेत.

अतिश बाळासाहेब हाके (रा. जांभे, ता. मुळशी) असे अटक केलेल्या व्यक्तीचे नाव आहे. फरासखाना पोलिस हद्दीत तपास पथकाकडून गस्त सुरू होती. त्या वेळी गणेश पेठेत एकजण मांडुळाची तस्करी करण्यासाठी येणार असल्याची माहिती पोलिस उपनिरीक्षक प्रमोद हंबीर यांना मिळाली. त्यानुसार यशपाल सूर्यवंशी, शंकर कुंभार, मयूर भोकरे यांच्या पथकाने सापळा रचून हाके याला ताब्यात घेतले. त्याच्याकडील पिशवीची झडती घेतली असता त्यामध्ये मांडूळ असल्याचे आढळून आले. त्याची माहिती वन विभागाला देण्यात आली आहे. आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत या मांडुळाची किंमत तीन लाख रुपये आहे. त्याने हे मांडूळ कोठून आणले आहेत, तो कोणाला त्याची विक्री करणार होता, याचा शोध घेण्यात येत आहे.

लोकमत – दि. १९ फेब्रुवारी, २०२०

# आठ गाड्यांची तोडफोड करणारे आरोपी सीसीटीव्हीमुळे जेरबंद

सहकारनगर : दत्तवाडीमधील लडकतवाडीमध्ये नुकत्याच जेलमधून बाहेर आलेल्या आरोपीकडून आठ गाड्यांची तोडफोड करण्यात आली. यामध्ये चारचाकी गाड्यांच्या काचा फोडून ५० ते ६० हजार रुपयांचे नुकसान झाले. याबाबत दत्तवाडी पोलिसांनी गुन्हा दाखल केला असून, यातील अल्पवयीन आरोपीला ताब्यात घेतले केले. त्याला हत्यारासोबत ताब्यात घेतले आहे. दुसरा आरोपी अभिषेक येनपुरे ऊर्फ कोक्या हा अजून फरार आहे. याच्यावर गुन्हेदाखल असून हा नुकताच जेलमधून सुटला असून त्याने दहशत निर्माण करण्यासाठी हे कृत्य केले असून तेथील स्थानिक नागरिकांनी या ठिकाणी पेट्रोलिंग करावे, अशी वारंवार मागणी केली होती. मात्र, पोलिसांनी दुर्लक्ष केल्याने ही घटना घडल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे. आरोपीवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यामध्ये अल्टो, तवेरा, टाटा टेम्पो, रिक्षा, क्रिस्टा अशा आठ गाड्यांची तोडफोड करण्यात आली आहे. घटनास्थळी पोलीस उपायुक्त पौर्णिमा गायकवाड, सहायक पोलीस आयुक्त पोमाजी राठोड, वरिष्ठ पोलीस निरीक्षक देविदास घेवारे आणि पोलीस निरीक्षक राजेंद्र सहाणे हजर होते.

TIMES OF INDIA - 4 February, 2020

# 4 detained for firing at bizman over old enmity

Pune: Tension gripped Tukainagar in Vadgaon Budruk on Monday afternoon, after the owner of a car wash and repair centre was fired upon. Later in the day, the Sinhagad Road police detained four of the six involved in the incident.

The suspects also damaged windshields of three cars parked at the spot, police said. Pandurang Khandu More (42) of Narhe, who escaped with no injuries, lodged a complaint with the police.

Police said all four detained were members of a local gang run by one Bunty Pawar, who has a criminal record of robbery, extortion and other body offences. Police said the suspects believed that More was a police informant.

According to the complaint, More arrived at his service centre at 2.20pm and was standing in front of it, when the six suspects came there on motorcycles. Five were armed with sharp weapons, while one brandished a firearm.

The person with the gun abused More and shot at him. More managed to duck in time. The bullet pierced the service centre's tin enclosure. The other five men then charged at him, police said.

The complainant managed to give them the slip. "Enraged, the suspects damaged cars parked nearby," police said. They have been booked under the charge of attempt to murder and relevant sections of the Indian Arms Act.

महाराष्ट्र टाइम्स – दि. २० फेब्रुवारी, २०२०

# फरारी आरोपीला अकरा वर्षांनी अटक

म. टा. प्रतिनिधी, पुणे

कोथरूडमधील डहाणूकर कॉलनी येथे घरफोडीच्या गुन्ह्यातील फरारी आरोपीला गुन्हे शाखेच्या पोलिसांनी ११ वर्षांनंतर अटक केली आहे. आरोपीने मधल्या काळात अकलूज पोलिस ठाण्याच्या हद्दीत दरोड्याचा गुन्हा केला असून, त्यावर महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी कायद्यान्वये (मोका) कारवाई केली होती. त्यामध्येदेखील तो फरारी होता.

सनी ऊर्फ विष्णू धर्मा कांबळे (वय ४८, रा. गांधीनगर, देहूरोड, सध्या रा. गायकवाड वस्ती, इंदापूर) असे अटक केलेल्या आरोपीचे नाव आहे.



डहाणूकर कॉलनी येथील भारती बस्तवडे यांच्या फ्लॅटमध्ये २००९ला घरफोडीची घटना घडली होती. या गुन्ह्यात दोन आरोपींना अटक करण्यात आली होती; पण, कांबळे फरारी होता. 'पाहिजे' असलेल्या आरोपींचा शोध घेण्यासाठी नेमलेल्या गुन्हे शाखेतील पोलिस कर्मचारी महेश निंबाळकर यांना कांबळे इंदापूर परिसरात राहत असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार त्यांनी सहायक आयुक्त डॉ. शिवाजी पवार यांना माहिती देऊन मंगळवारी रात्री त्याला ताब्यात घेतले. चौकशी केल्यानंतर त्याने फेब्रुवारी २०१४मध्ये सात ते आठ साथीदारांमार्फत अकलूज पोलिस ठाण्याच्या हद्दीत दरोड्याचा गुन्हा केल्याचे समोर आले; तसेच, या गुन्ह्यात त्याच्यावर 'मोका'ची कारवाई करण्यात आली. मात्र, त्या गुन्ह्यातही तो फरारी होता. नंतर त्याला अटक करून पुण्यात आणण्यात आले व कोथरूड पोलिसांच्या ताब्यात दिले गेले. कोथरूड पोलिसांकडून अकलूज पोलिसांनी त्याचा ताबा घेतला आहे.

लोकमत – दि. २० फेब्रुवारी, २०२०

# अकरा वर्षांपासून 'वाँटेड' अखेर झाला गजाआड

## घरफोडीचा गुन्हा : मोक्काचा फरार गुन्हेगार

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** शहरात वेगवेगळ्या ठिकाणी केलेल्या घरफोडीच्या गुन्ह्यातील तसेच अकलूज येथील पोलीस ठाण्यातील संघटित गुन्हेगारी (मोक्का) फरारी आरोपीला तब्बल अकरा वर्षांनी अटक केली. सनी ऊर्फ विष्णू धर्मा कांबळे (वय ४८, रा. गांधीनगर, देहूरोड व सध्या रा. गायकवाडवस्ती, इंदापूर) असे अटक केलेल्याचे नाव आहे. सनीला कोथरुड पोलिसांनी न्यायालयात हजर केले असता त्याला पुन्हा पुढील तपासासाठी अकलूज पोलिसांकडे दिले आहे.

भारती बस्तवडे (रा. डहाणूकर कॉलनी, कोथरुड) व त्यांच्या शेजारील घराचे कोयंडे उचकटून चोरट्यांनी २७ जून २००९ रोजी ४७ हजारांचा ऐवज चोरुन नेला होता. याप्रकरणी कोथरुड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाल्यानंतर राहुल भोसले आणि शत्रुघ्न भोसले यांना १० फेब्रुवारी २०१० रोजी अटक केली होती. मात्र, सनी कांबळे पोलिसांना हूल देण्यात यशस्वी झाला.

सनी हा पारधी वस्तीवर लपून बसला असल्याची माहिती गुन्हे शाखेच्या पथकातील पोलीस हवालदार महेश निंबाळकर यांना मिळाली होती. याबाबत सहायक पोलीस आयुक्त डॉ. शिवाजी पवार यांना माहिती दिल्यानंतर त्यांच्या आदेशानुसार पोलीस कर्मचाऱ्यांनी तत्काळ इंदापूर पोलीस ठाणे गाठून तेथील कर्मचाऱ्यांची मदत घेतली. सनी याला पारधी वस्तीवरुन रात्री साडेअकरा वाजण्याच्या दरम्यान मंगळवारी ताब्यात घेऊन पुण्यात आणले.

### ज्येष्ठ नागरिकाला पाइपने मारहाण करीत दरोडा

१ सनी आणि त्याच्या सात ते आठ साथीदारांनी अकलूज पोलीस ठाण्याच्या हद्दीत २२ फेब्रुवारी २०१४ रोजी रस्त्याने जाणाऱ्या नागरिकांना कोयता, चाकूचा धाक दाखवून लोखंडी पाइपने मारहाण करून हातपाय बांधून दरोडा घातला होता. यामध्ये त्यांनी ८२ हजार ४०० रुपयांचा ऐवज चोरुन नेला होता. या प्रकरणात दरोडा आणि मोक्काच्या विविध कलमांन्वये कारवाई केली.

२ गुन्ह्यातील सर्व जणांवर १० ते १२ गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल आहेत. सनी हा गुन्हा घडल्यापासून फरार होता. अपर पोलीस आयुक्त अशोक मोराळे, पोलीस उपायुक्त बच्चन सिंग, सहायक पोलीस आयुक्त डॉ. शिवाजी पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस हवालदार महेश निंबाळकर, सहायक पोलीस फौजदार संभाजी नाईक यांच्या पथकाने ही कारवाई केली.

# नायजेरियन तरुणाकडून ३५ लाखांचे कोकेन जप्त

लोकमत न्यूज नेटवर्क

**पुणे :** कोकेन विक्रीसाठी दुचाकीवरुन आलेल्या नायजेरियन नागरिकाला अमली पदार्थ विरोधी पथकाने पकडले. त्याच्याकडून ३४२ ग्रॅम कोकेन, रोख रक्कम, दुचाकी असा ३५ लाख रुपयांचा ऐवज जप्त केला.

व्हॅलेंटाइन ऊर्फ जेम्स अमुचे ईझेजा (वय २८, रा. हर्षता कॉम्प्लेक्स, हांडेवाडी, मूळ नायजेरिया) असे अटक केलेल्याचे नाव आहे. कारवाई कात्रज सासवड बायपास रोडवर गुरुवारी करण्यात आली.

कोकेन बाळगणारा नायजेरियन नागरिक दुचाकीवरुन येणार असल्याची माहिती पोलीस उपनिरीक्षक हेमंत ढोले यांनी मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी विद्या प्रबोधिनी नॅशनल स्कूलजवळ सापळा रचून त्याला पकडले. त्याच्याकडून ३८ हजार ३४० रुपये, ३४२ ग्रॅम कोकेन व गुन्ह्यात वापरलेली दुचाकी जप्त केली आहे. ही कामगिरी पोलीस निरीक्षक विजय टिकोळे, पोलीस उपनिरीक्षक हेमंत ढोले, शिंदे, काकडे, जोशी, दिवेकर, शिर्के, साबळे, साळवी, महेंद्र पवार, राहूल जोशी, शिवाजी राहीगुडे, अमित छडीदार, योगेश मोहिते यांच्या पथकाने केली.

## नायजेरियनकडे नाही वास्तव्याचा पुरावा

अंमली पदार्थ पुरविण्याची फोनवर ऑर्डर घेऊन ती पुरविण्यासाठी जाणाऱ्या नायजेरियन तरुणाची माहिती अपर पोलीस आयुक्त अशोक मोराळे यांना मिळाली होती. त्यानुसार सापळा रचून व्हॅलेंटाइन ईजेजा याला अटक करण्यात आली आहे. त्याच्याकडून कोकेन जप्त करण्यात आले आहे. त्याची चौकशी केली असता तो कोणताही परवाना नसता अवैधरित्या पुणे शहरात राहत असल्याचे आढळून आले आहे.